# मातृमंदिर देवरुख

## वार्षिक अहवाल २०२२-२३



स्थापना – १९५४

# मातृमंदिर देवरुख

Reg. No. RE 68

देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी - ४१५ ८०४ (महाराष्ट्र)

संस्थापिका - श्रीमती इंदिराबाई हळबे

दूरध्वनी - ०२३५४ - २९५०८१, इ-मेल - matrumandir_54@rediffmail.com वेबसाईट - https://matrumandirdevrukh.org

## विश्वस्त मंडळ


सुचेता कोरगावकर


बबन डिसोझा


जॉर्ज पटेल


मा. हुसेन दलवाई

## कार्यकारी मंडळ


**मेघना चाळके**
अध्यक्ष


**पल्लवी कोरगावकर**
उपाध्यक्ष


**विलास कोळपे**
उपाध्यक्ष


**उदय लोध**
उपाध्यक्ष


**अभिजित हेगशेट्ये**
कार्याध्यक्ष


**विनय पानवलकर**
कार्यवाह


**सुनील कोलवणकर**
कार्योपाध्यक्ष


**अनिल अणेराव**
कोषाध्यक्ष


**सुहास बने**
कार्यवाह

## कार्यकारी मंडळ सदस्य


**संतोष शेट्ये**


**आत्माराम मेस्त्री**


**संदेश शेट्ये**


**विजय नारकर**

दि. १ सप्टेंबर २०२३

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

मातृमंदिर संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दि.२१ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी २ वाजता खालील विषयांवर चर्चा करण्यासाठी घेण्यात येईल. गण संखेच्या अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा वरील वेळानंतर अर्ध्या तासानंतर सुरु होईल. अशा सभेला गण संख्येची अट असणार नाही.आपण या सभेला अवश्य उपस्थित राहावे, ही विनंती.

**आपले,**

| | | |
|---|---|---|
| **विनय पानवलकर** | **अभिजित हेगशेट्ये** | **सौ.मेघना चाळके** |
| **सुहास बने** | कार्याध्यक्ष | अध्यक्ष |
| कार्यवाह | | |

सभेपुढील विषय

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन २०२२-२३ या वर्षाचे ऑडीटेड हिशोब व अहवालाला मंजुरी देणे.

३. सन २०२३-२४ या वर्षासाठी हिशोब तपासनीस नेमणूक करणे.

४. संस्थेच्या विविध विभागांची व कार्यक्रमांची माहिती देणे.

५. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांची विचार करणे.

वि.सू. - आपला ई-मेल व वॉट्सअप नं.
matrumandir_54@rediffmail.com या मेलवर कळवावा.

# मनोगत



करोना संकटकाळानंतर खर्या अर्थाने मोकळा श्वास घ्यावा असा हा कालावधी. जणू जगण्याची सुरवातच नव्या दमाने करावी , संकटावर मात करत आलेली नव्या आशा, आकांशा आणि जी-द्द सोबत सुरु झालेला हा प्रवास अत्यंत उत्साहवर्धक होता. पंचवार्षीक निवडणूकीनंतर आलेले नवे कार्यकारिणी मंडळ अधिक कार्यक्षमतेने गतीमान झाल्याने मातृमंदिरच्या कार्याचा विस्तार वाढत असतांना त्यांत युवती शिक्षण, सक्षमिकरण, युवा संवाद,कौशल्याधारीत शिक्षण,आरोग्य, बालसंगोपन, कृषी आदी विविध स्तरावर विविध उपक्रमांद्वारे हजारो महिला आणि युवांपर्यंत मातृमंदिर पोहोचवितांनाच नव्या चेहर्यांना या सामाजिक आणि वैचारिक वाटचालीच्या प्रवाहात सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात हे संचालक मंडळ निश्चितच यशस्वी झाल्याचा विश्वास या निमित्ताने व्यक्त करतांना आनंद होत आहे.

मावशी यांचे पहिले स्वप्न होते, खेड्यापाड्यातील महिलांना प्रसुती आणि आरोग्य सेवा देण्याचे आणि दुसरे प्राधान्य होते, अनाथ बालकांना आधार देण्याचे त्यांचे उत्तम संगोपन करतांनाच त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणत स्वतःच्या पायावर उभे करण्याचे. १९६५ साली मावशी यांनी गोकुळ माध्यमातून सुरु केलेल्या या करुणा आणि मायेच्या सेवेला मुळापासून सुरुगं लावण्याचे काम एक मल्टीनॅशनल एनजीओ कंपनी करु पहात होती. त्यासाठी वरीष्ठ पातळीवर फॅमीली बेस केअर प्रकल्प उतरविला. मात्र मातृमंदिर संस्थेचे सेक्रेटरी आत्माराम मेस्त्री यांच्या कठोर आणि चौकस परिक्षणाने यातील भविष्यातील अशा अनाथ मुलींच्या उध्वस्त होणार्या छत्राची दखल घेत, मातृमंदिर च्या पातळीवरच प्रसंगी त्यांचे  अनुदान नाकारण्याचे धारिष्ठ्य दाखविले. यामुळेच महाराष्ट्रातील बंद करु पहाणारी शेकडो हजारो बालगृहे आजही त्यांचे काम करत राहिली आणि कोविड काळात हजारो आई बापा विना पोरके झालेल्या निराधार मुलांना मायेचे आणि सुरक्षेचे छत्र लाभले. महाराष्ट्रात  एफबीए चा भुलभुलैया योजनेला पहिला विरोध करणारी आणि त्यासाठी लाखो रुपयांचे अनुदान नाकरणारी मातृमंदिर ही पहिली संस्था होती. मावशी  यांचा वैचारीक वारसा जपण्याचे काम संस्थेने या माध्यातून केले. आणि आज संपुर्ण जिल्हयातील महिला बाल कल्याण केंद्र आणि सीडबल्यूसी यांनाही त्याचे महत्व पटले असून मातृमंदिर ही जिल्ह्यातील मुलींच्या उत्तम आरोग्य आणि संरक्षण आणि शिक्षण देणारी आदर्श संस्था म्हणून नोंदली गेली आहे. याचा अभिमान आहे.

गोकुळ येथील बालगृह सांभाळतांना उत्तम आहार, आरोग्य,स्वच्छ पाणी, अल्हादायक परिसर यासोबत कौटुंबीक जिव्हाळा, आपुलकी,  संरक्षण आणि उच्च शिक्षण या सुविधा येथील मुलीनां दिल्या जात आहेत. त्यामुळेच गेल्या वर्षी ४-५ मुलींचे बालगृह आज १८ मुलींनी गजबजले आहे. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणानंतर काही मुली व्यवसाय भिमुख उच्च शिक्षणासाठी मुंबई व अन्य शहरातून शिक्षण घेत आहेत. अनेक मुलींना कौशल्याधारीत शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबीत्वाचे शिक्षण दिले जात आहे. मातृमंदिर संस्थेचे गोकुळ बालगृह म्हणजे प्रज्ञा आणि उत्साह याचे उर्जा केंद्र आहे

# मनोगत

समाजाच्या विविध घटकातून आणि अत्यंत वाईटातील वाईट परिस्थितीतून पिचलेल्या, शोषण झालेल्या तर कधी समाजानेच नाकारलेल्या अनेक जणी येथे येतात आणि या कुटुंबाचे बनून जातात. हा विलक्षण मायेचा आणि करुणेचा ओलावा या परिसरात समता, समानता आणि बंधुतेचा स्पर्ष नेहमीच नवोन्मेषाची उर्जा देत रहातो. आज महाराष्ट्रातील आणि पदेशातील अनेक लोक हा मायेचा स्पर्ष अनुभवण्यासाठी येथे येतात, संवाद करत रहातात. आणि परततांना खूप काही अनुभवाची आणि दूसर्यासाठी जगण्यातील आनंदाची शिदोरी घेऊन जातात. मावशी यांनी सुरु केलेला हा प्रेमाचा झरा आजही तितक्याच शितलतेने झुळझुळ वहात अनेकांचे प्रेरणास्त्रोत होत आहे. हेच मोठे समाधान.

गोकुळ विभाग हा रत्नागिरी जिल्ह्यातील निराधार आणि असाह्य बालक आणि मुलींचा आधार येथील शासकीय यंत्रणा आणि सामाजिक संस्थांना वाटतो हे विशेष उल्लेखनीय आहे. गोकुळ हा विभाग अशा मुलींना फक्त एक आहार आणि छत याचा आधार रहात नाही तर त्यासोबतच उत्तम शिक्षण, संस्कार आणि जीवन शैली देण्याचा महत्वाचा भाग होऊ पहात आहे. त्यामुळेच येथील मुलींना त्यांच्या अंगभूत कौशल्यांना आणि बौध्दीक क्षमतेला अत्यूच्च संधी देणार्या सुविधा उपल्बध करुन द्याव्यात यासाठी येत्या काही वर्षात गोकुळ एक महत्वाकांशी अद्ययावत बालगृह प्रकल्प हाती घेत आहे. त्याचा मेगा प्लॅनही तयार झाला आहे. त्यासाठी गुंतवणूक मोठी आहे. त्यामुळे निधी संकलनाची मोठी जबाबादारी येणार आहे. मात्र संपुर्ण राज्यातील एक अत्यूत्तम अल्ट्रामॉडर्न बालगृह बनविण्याचा हा संकल्प आहे.

कोविडच्या काळातील संस्थेच्या आवाहनाला जगभरातील मातृमंदिर हितचिंतकांनी प्रतिदास दिला. देवरुख येथे सुपरमल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल उभारणीच्या संकल्पीत आराखड्याचे उदघाटन रत्नागिरीचे पालकमंत्री ना. उदय सामंत यांच्या हस्ते अत्यंत उत्साही वातावरणात झाले. यांतील पहिल्या टप्याची ६००० चौ फुटाची अत्यंत अद्ययावत इमारत पुर्ण झाली आहे. लवकरच ती रुग्ण सेवेला सज्ज होईल. त्याच्या पुढच्या टप्यांसाठी अधिक मोठ्या निधीची गरज लागणार आहे. तो उभारणे हे येत्या काळातील मोठे आव्हान असणार आहे.

चिपळूण पुरग्रस्तांसाठी मातृमंदिरने फार महत्वाचे काम केले होते. महाराष्ट्रातील १५ पेक्षा अधिक संस्थांना जोडत लाखो रुपयांची मदत वाटप केली, अनेक महिलांना हातगाडी, शिलाई मशीन दिले. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय चिपळूण चिखलमुक्त करण्याचे काम मातृमंदिरच्या आयटीआय, कृषी विद्यालय आणि नवनिर्माणच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रसेवादलाच्या बॅनरखाली केले होते. याची दखल घेत राष्ट्रसेवादलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. गणेश देवी यांनी चिपळूण येथे एक पूर आणि पर्यावरण परिषद आयोजित केली होती यावेळी त्यांनी वाचनालयाला २५००० पुस्तके देण्याचे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे डॉ. गणेश देवी यांनी देशातील विविध लेखक आणि सामाजिक सांस्कृतीक चळवळीत असणार्या कार्यकर्त्यांना पुस्तके देण्याचे आवाहन केले होते त्याला उत्तम प्रतिसाद आला आणि यावर्षी ती पुस्तके राष्ट्रसेवादल आणि मातृमंदिरच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाला देण्यात आली.

बाल आणि युवा संवाद हा मातृमंदिरचा एक विशेष उपक्रम आहे. पुरोगामी विचार आणि विवेकाचा जागर हाच युवा शक्तीला नवा देश घडविण्यासाठी संस्कार देणार आहे. या देशाचे संविधान आणि त्यातील मुलतत्वे ही बालमनावर संस्कारीत करतांना आपल्या भवतालाचे भान बालमनाला व्हावे यासाठी ऋतु संवाद शिबीराचे आयोजन होत आहे. प्रमुख तीन ऋतुंशी निसर्ग आणि माणूस याचे नाते जोडण्याचा अभिनव प्रयोग लोकाभिमुख झाला आहे. त्याच जोडीला युवा संवाद शिबीर संकल्पनेला महाराष्ट्रातील युवकांकडून मोठा प्रतिसाद येत आहे. अशा शिबीरातून मान्यवर अभयासक वक्ते आणि सामाजिक क्षेत्रात काम करणार्या आणि योगदान देणार्या व्यक्तींना निमंत्रीत करुन वैचारिक आदान प्रदान आणि चर्चा, परिसंवादाची घूसळण युवंसाठी आकर्षण ठरत आहे. या शिबीरांना व्यापकता देणे हे पुढील काळातील मातृमंदिरचे महत्वपूर्ण काम असेल. कोल्हापूरच्या अंधमुलांचे  मातृमंदिर शेतावरील अनुभूती  शिबीर या परिसराला आणि परिवाराला वेगळी अनुभूती देणारे होते.

माहेरवाशीणींचे कोडकौतूक आणि स्नेह संमेलन हा मावशींच्या काळातील एक महत्वपुर्ण उपक्रम  गेल्या काही वर्षात तो ठरावीक काळापूरताच मर्यादीत झाला होता त्याला त्या कक्षेतून बाहेर काढत यावर्षी नव्या जुन्या गोकुळच्या माजी प्रवेशीतांचा स्नेह मेळावा अत्यंत नावीन्यपुर्ण पध्दतीने साजर करण्यात आला.

कोकणच्या सडा माळरानावरील जैवविविधतेची वैशीष्ठ्यपुर्णता  आणि ओळख जपणारा दीपकाडी महोत्सव संपुर्ण महाराष्ट्राचे आकर्षण होऊ पहात आहे. सातारा येथील कास पठारावरील वैविधता दुर्मिळ होत असतांना मातृमंदिरच्या साडवली येथील सडा पठारावरील दीपकाडी आणि विविध रानफुलांचाऑगस्ट मध्ये येणरा बहर आणि त्याचा साजरा होणारा महोत्सव हा पर्यावरण अभयासक आणि हजारो विद्यार्थ्यांचा अभयासाचा आणि आकर्षणाचा विषय ठरत आहे. यामाध्यमातून मातृमंदिर देवरुख परिसराला पर्यावरण अभयास आणि पर्यटन याचे नवे दालन खुले करुन देत आहे.

या काळात मातृमंदिरने विविध प्रयोगशील प्रकल्प राबविले तर काही नव्या संकल्पना आणि क्रिएटीव्ह चळवळींना आणि प्रकल्पांना सहाय्य केले. ज्या माध्यमातून मावशींना येथे रुजविलेला विचार अधिक प्रगल्भ व्हावा आणि त्याचे रुपांतर रचनात्मक चळवळीत उभे रहावे यात अपना बँकेचे मानद अध्यक्ष  मा. दत्ताराम चाळके यांच्या प्रयत्नातून अद्ययावत दंतचिकित्सा चिकित्सा आणि उपाय शिबीर, सुहास बने आणि विलास कोळपे यांच्या प्रयत्नातून डॉ. पोयेकर यांनी घेतलेले कॅन्सर तपासणी शिबीर,  कृषी उत्पादनाला ग्लोबल करणारा कलिंगड महोत्सव, काळा भात लावणीमहोत्सव, आमने सामने या नाट्य प्रयोगाच्या माध्यमातून मुंबईत अनेक नव्या जुन्या कार्यकर्त्यांना जोडत उभारलेला निधी, आयटीआय माजी विद्यार्थी संमेलनाचा पहिलाच प्रयोग, टाटा उद्योग समुहात आयटीआय मधील मुलांच्या पुर्ण बॅचचेच झालेले ट्रेनिंग प्लेसमेंट, मातृमंदिरच्या निधी संकलनासाठी काही संचालकांनी मुंबईत स्वतः फिरुन जमविलेला काही लाखांचे निधी संकलन हे संस्थेला प्रगतीपथावर नेणारे ठरले आहे.

# मनोगत

मातृमंदिर संस्था आणि परिसर हा पुरोगामी समाजवादी वैचारिक चळवळीचे केंद्र आहे. जेष्ट समाजवादी नेते भाऊ तेंडूलकर, साथी एस एम जोशी, बॅ. नाथ पै, नानासाहेब गोरे ते प्रा. मधू दंडवते , जगन्नाथ जाधव , मेधा पाटकर, सुरेखा दळवी यांच्या पर्यंत मावशी यांनी ही परंपरा जाणीवव पुर्वक जोपासली आणि चळवळीच्या विविध उपक्रमांना आणि वैचातरिक वाटचालीला सहाय्यभूत ठेवली. हीच परंपरा पुढे चालू ठेवण्यात विद्यमान कार्यकारीणी मंडळ वैचारिक आणि रचनात्मक पातळीवर सक्रिय आहे. त्यातूनच जलजीवन मिशन शिबीर, बुधवार वाचनगटाचा दर आठवड्याला होणारा कार्यक्रम त्यांतील संस्था सहभाग, गोधडी प्रकल्प, अनिस, राष्ट्रसेवादल शाखा आणि अन्य पुरोगामी चळवळीचे विविध उपक्रम त्याला सहकार्य आदी विविध उपक्रमांनी परिसर सदैव गजबजलेला रहात आहे.

मातृमंदिरच्या कृषी क्षेत्राला प्रा. मधू दंडवते कृषी विद्याल हा तांत्रीक आधार देण्याचे काम नारकर भाऊ यांनी अनेक वर्षापुर्वी केले. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ अंतर्गत असणार्या या पदविका अभयासक्रमा सोबत अधिक कौशल्य तंत्रज्ञान आणि रोजगारभिमुख अभयासक्रम सुरु करावा असा विचार गेली तीन वर्षे संचालक मंडळात प्रामुख्याने होत होता. या प्रयत्नांना या वर्षी यश प्राप्त झाले आणि नागपूर पशुवैद्यकीय विद्यापीठाचा अत्यंत उच्च दर्जाचा मानला जाणारा पशुवैद्यकीय प्रशिक्षण आणि दुग्धव्यवसाय हा पदविका अभ्यासक्रम संस्थेला मंजूर झाला आहे. कॅप राऊंड प्रक्रिया माध्यामातून त्याची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. या अभयासक्रमाल महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून विद्यार्थी मातृमंदिरला शिक्षण घेण्यासाठी येतील. कृषी विभाग आर्थिक सक्षम होण्या बरोबरच तांत्रीक पातळीवर अद्ययावत होईल आणि महाराष्ट्रातील शेकडो मुलांना शिक्षणाचा आधार ठरेल. या प्रकल्पातील संचालक मंडळातील सर्व सहाकर्यांनी जे अनमोल सहकार्य केले त्यातूनच हा प्रकल्प उभा राहीला. मातृमंदिरच्या भावी काळात ही एकजूटता आणि सहकार्यच मातृमंदिरच्या विकासाची ताकद ठरणार आहे.

संस्थेच्या पंचवार्षीक निवडणूकीनंतर कार्यकारिणीत नव्याने निवडून आलेले सौ. मेघना चाळके, (अध्यक्ष), विनय पानवलकर ( कार्यवाह), उदय लोध ( उपाध्यक्ष), बापू शेट्ये (सदस्य), विजय नारकर (सदस्य) हे मातृमंदिरच्या भविष्यातील स्वप्नांना आकार देणारे आधारस्तंभ आहेत. गेल्यावर्षभरातील प्रत्येक प्रकल्पातील त्यांचा उत्सफूर्त क्रियाशील सहभाग मातृमंदिरच्या गतीमानतेचे प्रतिक आहे. मातृमंदिरचे सर्व पदाधिकारी आणि संचालक अत्यंत उत्साही आणि कार्यक्षम आहेत हेच संस्थेच्या प्रगतीचे आणि प्रगल्भतेचे गमक आहे. सर्व सभासद आणि हितचिंतकांना मनापासून शुभेच्छा !

अभिजित हेगशेट्ये
कार्याध्यक्ष
मातृमंदिर देवरुख

# गोकुळ

मागील ६५ वर्ष शेकडो अनाथ मुलांना आधार देणार मातृमंदिरचा अतिशय महत्वाचा व तितकाच जबाबदारीचा विभाग असणारे गोकुळ म्हणजे एक कुटुंबच आहे. या कुटुंबात आनंदान मुलींचे संगोपन आनंदाच्या वातावरणात केले जात आहे. ज्यामध्ये मुलींचे आरोग्य, शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसन केले जात आहे. मुलींच्या संरक्षणाच्या दृष्टीने कायद्याने घालून दिलेल्या नियमांच्या चौकटी बदलत आहे त्यानुसार गोकुळ नवे आकार घेत पुढे जात आहे. या वर्षातील नवीन दाखल संख्येत भर पडली असून त्या मुलींना केवळ वाढविण्यापलीकडे संस्था मूल्य आणि मानवतावादी विचार देखील देत आहे.

| अनु.क्र | गोकुळ प्रवेशित संख्या (२०२२-२३) | नवीन दाखलप्रवेशित संख्या (२०२२-२३) |
|---|---|---|
| १. | १५ | ०६ |

| | |
|---|---|
| **इयत्ता १ ली ते ५ वी** | ०४ |
| **इयत्ता ६ वी ते १० वी** | ०४ |
| **इयत्ता ११ ते १२ वी** | ०३ |
| **मातृमंदिर औद्योगिक प्रशिक्षण केंद्र** | ०४ |

## गोकुळ बालगृहातील २०२२-२३ मधील महत्वाचे उपक्रम



- **एप्रिल २०२२**

१. रुतुसंवाद शिबीर उन्हाळी शिबीरात गोकुळ प्रवेशितांचा सहभाग.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली

- **मे २०२२**

१. साने गुरुजी स्मारक रायगड, महाड लेणी, चवदार तळे, प्रतापगड किल्ला, दापोली समुद्र या ठिकाणी वार्षिक सहल नेण्यात आली.
२. मासिक पाळी स्वच्छता दिन- प्रा. आरती पानवलकर यांचे सत्र व संवाद
३. 'प्रेम मैत्री आकर्षण'- प्रा. आरती नाईक यांचे ऑनलाईन सत्र व संवाद

- **जून २०२२** - नवीन शैक्षणिक वर्ष प्रारंभ

# गोकुळ

- जुलै २०२२

मातृमंदिर भातलावणी कार्यक्रमात गोकुळ प्रवेशितांचा सहभाग.

- ऑगस्ट २०२२

१. डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृतिदिन
२. बालहक्काचा गणपती (गणेशचतुर्थी)
३. अपना सहकारी बँक. लि. शाखा देवरुख येथे बँकेचे कामकाज समजून घेण्यासाठी बँक भेट
४. देवरुख पोलीस ठाणे, देवरुख कामकाज समजून घेण्यासाठी पोलीस ठाण्याला भेट व पोलीस निरीक्षक यांच्याशी गोकुळचा संवाद
५. आपत्ती व्यवस्थापन माहिती सत्राचे आयोजन
६. अहिल्याबाई होळकर जयंती साजरी करण्यात आली.

- सप्टेंबर २०२२

१. पोषण माहे निमित्त कडधान्याची रांगोळी व माझे आरोग्य यावर संवादसत्र
२. पोषण माहे उपक्रमांतर्गत वैयक्तिक स्वच्छता सत्र – प्रा. आरती पानवलकर

- ऑक्टोबर २०२२

१. निवासी ‘ ऋतूसंवाद’ हिवाळी शिबीरात गोकुळ प्रवेशितांचा सहभाग
२. ‘एक दिवा सामाजिक बांधिलकीचा’- गोकुळ दिवाळी वस्तू प्रदर्शन
३. ‘ दिवाळी पहाट’ कार्यक्रम
४. ‘ भाऊबीज’ कार्यक्रम
५. चंद्रग्रहण ऑनलाईन सत्र

- नोव्हेंबर २०२२

१. संविधान दिनानिमित्त ‘आपले संविधान’ यावर रविवार कट्ट्यातील चर्चा
२. वात्सल्य मंदिर ओणी येथील ‘आनंदमेळा’ कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग
३. राज्यस्तरीय ‘युवा संवाद’ शिबिरातमधील गोकुळ प्रवेशितेचा सहभाग

- डिसेंबर २०२२ - ख्रिसमस सण साजरा करण्यात आला.

- जानेवारी २०२२

१. नवीन वर्षाचे स्वागत
२. प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात गीतगायन व संचलन सहभाग
३. जिल्हा महिला व बाल विकास आयोजित जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव रत्नागिरी येथील स्पर्धांमध्ये घवघवीत यश

# गोकुळ

## फेब्रुवारी २०२३

१. मुंबई येथील जिल्हा महिला व बाल विकास आयोजित कोकणविभागीय बालमहोत्सवमध्ये गोकुळ सहभाग
२. आर्ट कॉलेज मध्ये शिकणाऱ्या गोकुळ प्रवेशितेची चित्रे स्नेहसंमेलन प्रदर्शनात प्रदर्शित झाली.
३. छ. शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली.

## मार्च २०२३

१. पुस्तकांची गुढी उभारण्यात आली. त्यावर चर्चा सत्र घेण्यात आले.
२.स्वच्छतेची मोहीम राबवून (सुक्या झाडांच्या पानांची) कचऱ्याची होळी करण्यात आली.

## एप्रिल २०२३

१. ऋतू संवाद उन्हाळी शिबिरात गोकुळ मधील लहान वयोगटातील मुलींचा सहभाग
२. ऋतू संवाद उन्हाळी शिबिरात गोकुळ मधील महाविद्यालयीन मुलींचा स्वयंसेवक म्हणुन सहभाग
३. मातृमंदिर फार्म वरील फळे व भाजीपाला यांचा गोकुळच्या मुलींनी विक्री स्टोल लावला. ज्यामध्ये मुलींना आर्थिक गणिते व व्यावहारिक ज्ञान प्रत्यक्ष अनुभवातून शिकता आले.
४. उन्हाळी सुट्टीत मातृमंदिर फार्म वर काजू बी गोळा करण्याचा अनुभव तसेच रानमेवा खाण्याचा एक धम्माल दिवस करण्यात आला.
५. आपत्ती व्यवस्थापन या विषयावर संस्थाअंतर्गत लेखी परीक्षा घेण्यात आली.
६ . जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय रत्नागिरी अंतर्गत मातृमंदिर गोकुळ आयोजित क्रीडा महोत्सव घेण्यात आला. ज्यामध्ये मैदानी व बैठे खेळ घेण्यात आले.

## मे २०२३

१. अनुभूती शिबिरात गोकुळ मधील महाविद्यालयीन मुलींचा स्वयंसेवक म्हणुन सहभाग.
२. गोकुळ माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा २०२३ यामध्ये दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये बालगृहातील मुलींपासून अठरा वर्ष पूर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या मुलींच्या महत्वाच्या प्रश्नांवर विविध अंगाने चर्चा सत्र आयोजित करण्यात आले. या चर्चेसाठी बालन्याय मंडळ सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, अधीक्षक प्रतिनिधी, संस्था प्रतिनिधी व प्रवेशित प्रतिनिधी यांचा समावेश होता.
३. गोपुरी आश्रम मालवण, बांबू कारखाना कुडाळ, लाकडी खेळण्यांची बाजारपेठ, सावंतवाडी राजवाडा, रॉक गार्डन, चिवला बीच, नाथ पै. सेवांगण या ठिकाणी गोकुळ २०२३-२४ सहल पार पडली.

# गोकुळ

## काही विशेष उल्लेखनीय गोष्टी

**मुल्यांकडून माणूसपणाकडे-**

मातृमंदिर मार्फत 'ऋतूसंवाद' उन्हाळी शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये बौद्धिक खेळ, नवीन गाणी व धम्माल करत निसर्ग समजून घेण्याच्या तीन दिवसीय शिबिरात घरात राहणाऱ्या इतर मुलामुलींसह बालगृहात राहणाऱ्या मुलांनी देखील हे शिबीर नक्कीच अनुभवायला हवं या अनुषंगाने 'ऋतूसंवाद' एप्रिल २०२२ (उन्हाळी) व ऑक्टोबर २०२२ (हिवाळी) शिबीरात मुलींना सहभागी करता आले. यामध्ये मुलींचा सहभाग हा सकारात्मक होता. बालगृहाबाहेरील जग नियमांच्या चौकटीत राहून मुलींना अनुभवता आले याचा संस्थेला विशेष आनंद वाटतो.

यानुसारच नोव्हेंबर २०२२ मध्ये पार पडलेल्या मातृमंदिर आयोजित राज्यस्तरीय युवा संवाद शिबिरात संस्थेतील युवा वयोगटातील बालिकेस सहभागी होता आले. अठरा वर्ष पूर्ण होऊन बाहेर पडल्यावर स्वःताच्या पायावर उभं राहता येईल परंतु माणूस म्हणून मानवी मूल्य, सामाजिक भान व युवक म्हणून आपली जबाबदारी या सगळ्या अंगाने हे शिबीर गोकुळच्या बालिकेस वैचारिक पोषण देणारं ठरलं. या शिबिरातील पथनाट्य, गट चर्चा, गाव भेट अश्या उपक्रमांमध्ये बालिकेचा सहभाग उत्तम होता.

**बालहक्कांचा श्री गणेशा-**

गोकुळचा दीड दिवसांचा गणपती 'बालहक्कांचा श्री गणेशा' या थीमवर गोकुळ बालगृहाच्या गणपतीची आरास करण्यात आलेली. यावेळी बालकांचे मुलभूत हक्क ज्यामध्ये जगण्याचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, संरक्षणाचा अधिकार, सुरक्षिततेचा अधिकार, समानतेचा अधिकार, विकासाचा अधिकार अश्या अधिकारांचा समावेश केला गेला. या हक्कांचे संरक्षण करणारे बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती, जिल्हा महिला व बाल विकास विभाग, बाल संरक्षण विभाग यांचाही उल्लेख थीम मध्ये करण्यात आला. विशेष म्हणजे संपूर्ण आरास पर्यावरणपूरक तसेच टाकाऊ पासून टिकाऊ अश्या पद्धतीने गणेशोत्सव २०२२ साजरा करण्यात आला. गणपती सुट्टीच्या उर्वरित दिवसांमध्ये बँकेचे कामकाज समजून घेण्यासाठी अपना सहकारी बँक. लि. शाखा देवरुख येथे बँक भेट दिली, पोलीस स्टेशनचे कामकाज समजून घेण्यासाठी देवरुख पोलीस ठाणे, देवरुख भेट देऊन पोलीस निरीक्षक यांच्याशी मुलींनी संवाद साधला, कोणतीही आपत्ती आली तरी मात करणे व त्याबाबत जाणून घेण्याकरिता आपत्ती व्यवस्थापन माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले.

**कलागुणांची उधळण- बालमहोत्सव**

जिल्हा महिला व बाल विकास विभाग आयोजित जिल्हास्तरीय व कोकणविभागीय चाचा नेहरू बाल महोत्सव २०२२ मध्ये रत्नागिरी व मुंबई येथील स्पर्धांमध्ये गोकुळ बालगृहाचा क्रीडा व सांस्कृतिक सहभाग हा क्रीडा व कलागुणांची उधळणच होती. खो-खो, कब्बडी, क्रिकेट, बुद्धिबळ, कॅरम, १०० मीटर धावणे, १०० मीटर रिले, लांब उडी, गोळा फेक यांसारख्या सगळ्याच स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन पारितोषिके मिळवली. त्याचसोबत सांस्कृतिक कार्यक्रमात पथनाट्य, सामुहिक नृत्य (लहान व मोठा गट) यांसारख्या स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळवत मुलींनी स्वतःचा व संस्थेचा एक वेगळाच ठसा उमटवला आहे.

# गोकुळ















# प्रसाद बालक मंदिर

**शैक्षणिक वर्ष –२२-२३**
**पटावरील संख्या – १०९**

| वर्ग | मुलगे | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| अंकुर (३ ते ४ वर्षे ) | १५ | १८ | ३३ |
| पालवी (४ ते ५ वर्षे ) | १६ | १६ | ३२ |
| फुलोरा (५ ते ६ वर्षे ) | २८ | १६ | ४४ |

## वर्षभरातील ठळक उपक्रम

- **दि. ९ जुलै २०२२ – आषाढी एकादशी**

विठ्ठलनामाचा गजर करत सर्व मुले व पालक पालखी घेऊन विठ्ठल मंदिरात गेली.

- **दि.१३ जुलै २०२२ – गुरुपोर्णिमा**

गुरुपोर्णिमा निमित्त मातृमंदिर संस्थापक हळबे मावशी यांच्या प्रतिमेला हार घालून त्यांच्या कार्याची माहिती मुलांना देण्यात आली.

- **१ ऑगस्ट २०२२ – नागपंचमी**

शाडूच्या मातीचे नाग बनवून मुलांनी रंगवले.

- **१० ऑगस्ट २०२२ – रक्षाबंधन**

शाळेत बनवलेल्या राख्या मुलींनी वर्गातील मुलांना बांधून रक्षाबंधन साजरा केला.

- **१५ ऑगस्ट २०२२ – स्वातंत्र्यदिन**

स्वातंत्रदिनाच्या झेंडावंदन करताना मुलांनी वेगवेगळ्या थोर देशभक्तांच्या वेशभूषा केल्या होत्या. मातृमंदिर कोषाध्यक्ष अनिल अणेराव यांच्या हस्ते झेन्दावंदन झाले. यावेळी मातृमंदिर मुख्याविभाग, कृषी विद्यालय, गोकुळ व बालवाडी पालक मोठ्या संखेने उपस्थित होते.

- **१८ ऑगस्ट २०२२ – गोपाळकाला**

राधाकृष्णाच्या वेशात आलेल्या मुलांनी उत्साहात हंडी फोडून उत्सव साजरा केला.

- २६ ऑगस्ट २०२२ – गणेशोत्सव

याप्रसंगी गणेशमूर्तीची पूजा व आरती करून गणेशोत्सवाचे महत्व सांगितले गेले.

- ३ ऑक्टोबर २०२२ – सरस्वती पूजन व पाटीपूजन

# प्रसाद बालक मंदिर

- **२१ ऑक्टोबर २०२२ – दीपोत्सव**

मुलांनी शाडू मातीच्या पणत्या केल्या, त्या रंगवल्या. रांगोळी काढून त्यावर पणत्या लावण्यात आल्या. याप्रसंगी संचालक, पालक व मातृमंदिर मित्रपरिवार उपस्थित होते.

- **१४ नोव्हेंबर २०२२ – बालदिन** - मुलांना फुलं देवून चाचा नेहरूविषयी माहिती सांगितली.
- **१० डिसेंबर २०२२ – ओझरेश्वर व मातृमंदिर फार्म सहल**

शेती फार्मवर मुलांना झाडे लावणासाठी मातीच्या पिशव्या भरण्यास शिकवले, प्रत्येकाला दिलेली चित्रे मुलांनी रंगवली. निसर्गाचा आनंद घेत मुलांनी वनभोजन केले.

- **२६ जानेवारी २०२२ – प्रजासत्ताक दिन**

प्रजासत्ताकदिनाला झेंडावंदन करताना मुलांनी थोर देशभक्तांच्या वेशभूषा केल्या होत्या.

- **३० जानेवारी २०२३** – यावर्षी पहिल्यांदाच वार्षिक क्रीडा महोत्सवात डेज चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये का,कॅप व गॉगल डे तसेच रेड डे साजरा करण्यात आला.
- **१ फेब्रुवारी २०२३ – क्रीडा स्पर्धा**

वार्षिक क्रीडास्पर्धांमध्ये अंकुर गटात बादलीत बॉल टाकणे व रुमाल उचलणे, पालवी गटात धावणे व चमचा लिंबू शर्यत, फुलोरा गटात नेम धरणे व बटाटा शर्यत या स्पर्धा घेण्यात आल्या.

- **४ फेब्रुवारी २०२३ – बालबहर – वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम**

मातृमंदिरच्या भव्य स्टेजवर झालेल्या या रंगारंग कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी उत्साही सहभाग घेतला. बालवाडीचे माजी विद्यार्थी दीपक जोशी, दिलीप विंचू, संतोष पुरोहित यांच्या हस्ते अनोख्या पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये, उपाध्यश विलास कोळपे, सेक्रेटरी विनय पानवलकर, सामाजिक कार्यकर्ते युयुत्सु आर्ते इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजली कारेकर बाईंनी केले.

- **२० मार्च २०२३ – शाळेत रंगपंचमी साजरी करण्यात आली.**
- **२१ एप्रिल २०२३ – फुलोरा गटाचा निरोप समारंभ**

याचवर्षी बालवाडीच्या ३ गटांना नावे देण्यात आली. यापैकी बालवाडीचा मोठा गट म्हणजेच ‘फुलोरा’ गटाचा निरोप समारंभ साजरा करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते मुलांना प्रमाणपत्र देण्यात आले. मुलांनीही शाळेला घड्याळ व सतरंज्या भेट दिल्या.

# प्रसाद बालक मंदिर

## देणगी यादी २०२२-२३

| क्र. | नाव | ठिकाण | देणगी |
|---|---|---|---|
| १ | विवेक गोविंद खाडिलकर | बोरीवली | १०,००० |
| २ | रवींद्र रामचंद्र शेळके | सायन | ३००० |
| ३ | सुरेखा जयंत मेहंदळे | बोरीवली | १०,००० |
| ४ | शरयू पाटील | चेंबूर | ५००० |
| ५ | वृषाली रमेश देव | | २०० |
| ६ | १०० रुपी सोशल ग्रुप | मुंबई | ५३१०७ |
| ७ | महिंद्रा अंड महिंद्रा | मुंबई | ३०००० |
| | एकूण | | १,११,३०७ / - |








# प्रा.मधु दंडवते कृषी विद्यालय

संस्थेचे प्रमुख विश्वस्त, माजी केंद्रीय रेल्वे व अर्थमंत्री प्रा.मधु दंडवते यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने संस्थेने जून २००८ मध्ये कृषी विद्यालय सुरु केले असून डॉ.बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोलीच्या मान्यतेने येथे २ वर्षांचा कृषी पदविका अभ्यासक्रम शिकविला जातो.

विद्यालयाचा सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील प्रथम वर्ष कृषी तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमाचा निकाल १०० टक्के लागला आहे.

- **दिनांक - ०१ जुलै २०२२** - **कृषि दिन**

- **दिनांक - ०१ ऑगस्ट २०२२** - **लोकमान्य टिळक पुण्यतिथी**
  लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी विदयालयाचे प्राचार्य श्री. समीर शरद जाधव , प्राध्यापक श्री.विनोद वाडकर , श्री.श्रीकांत करंबेळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला.

- **दिनांक - १३ सप्टेंबर २०२२ -** प्रा. मधु दंडवते कृषि तंत्र विदयालय,देवरुखच्या द्वितीय वर्षाचे कामकाज सुरु झाले .

- **दिनांक - ०२ ऑक्टोबर २०२२** - **महात्मा गांधी जयंती**

- **दिनांक - ०८ ऑक्टोबर २०२२** - **इंदिराबाई हळबे मावशी स्मृतिदिन**
  इंदिराबाई हळबे मावशी स्मृतिदिन साजरा करण्यात आली.

- **दिनांक - १२ नोव्हेंबर २०२२** - **प्रा. मधु दंडवते स्मृतिदिन**
  प्रा. मधु दंडवते स्मृतिदिन साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी विदयालयाचे प्राचार्य श्री. समीर शरद जाधव , प्राध्यापक श्री.विनोद वाडकर , श्री.श्रीकांत करंबेळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

- **दिनांक - ०५ डिसेंबर २०२२ ते १० डिसेंबर २०२२**
  प्रथम व द्वितीय वर्ष कृषि पदविका सहामाही परीक्षा पार पडली.

# मातृमंदिर शेती फार्म

मातृमंदिर फार्म म्हणजे मावशींच्या दूरदृष्टी आणि नियोजनाचा उत्तम उदाहरण. श्रमसंस्कार शिबिरे आणि शेतकरी प्रशिक्षणाच्या माध्यमातून इथे नंदनवन फुलले.

मातृमंदिर देवरुख च्या शेतीफार्मवर याहीवर्षी कलिंगड लागवड करण्यात आली होती. सोबतच भेंडी, गवार, मिरची, पडवळ,दोडका, वालय  काकडी,झेंडू अशी लागवड केली गेली.


येथील २४ एकरच्या जागेतील आंबा, काजू,फणस,नारळ,चिकू,कोकम इत्यादी फळझाडापासून चांगले उत्पन्न मिळण्याकरिता खते टाकलेली आहेत तसेच आवश्यक फवारणीचे नियोजन सुरु आहे.

फार्मवरील पूर्वी मोठ्या प्रमाणावर होत असलेली शेती पुन्हा सुरु करताना यावर्षी 'मातृमंदिर भातलावणी महोत्सव' साजरा झाला. कृषी विद्यालय,ITI , गोकुळ व मातृमंदिर परिवार या माध्यमातून काळा भात व इंद्रायणी भाताची लागवड केली गेली. सध्या फार्मवर केळीची लागवड केलेली आहे.

फार्मवरील गोठ्यामध्ये सध्या ८ गाई व ५ वासरे आहेत. यातून मिळणारे दुध आपल्या गोकुळमधील मुलींसाठी दिले जाते. गांडूळखत प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु असून फार्ममधील झाडे व इतर लागवडीसाठी हे खत वापरले जाते.










# श्रीमती इंदिरा बेहरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था
# साडवली

ऑगस्ट २०२२ या शैक्षणिक वर्षात ८३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सन २०२२-२०२३ सत्रात एकूण विद्यार्थी १५२ पटावर आहेत. आज पर्यंत आपल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून १९९३ विद्यार्थ्यांनी विविध व्यवसायात प्रशिक्षण घेतले. सुमारे ९०% विद्यार्थी नोकरी किंवा स्वयंरोजगार करीत आहेत.

अखिल भारतीय व्यवसाय वार्षिक परीक्षा जुलै / ऑगस्ट-२०२२ औदयोगिक प्रशिक्षण संस्थेत प्रात्यक्षिक परीक्षा यशस्वीरित्या पार पडल्या.सदर परीक्षेला प्रथम वर्ष ८१ व द्वितीय वर्षाचे ४९ असे एकूण १३० प्रशिक्षणार्थी बसलेले होते.सदर परीक्षेसाठी श्री.आर.ए.पवार, सहाय्यक अधिव्याख्याता शासकीय टेक्निकल स्कूल रत्नागिरी यांची परीक्षा केंद्राध्यक्ष म्हणून शासनाकडून नियुक्ती करण्यात आली होती. आपल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे कामकाज पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

अखिल भारतीय व्यवसाय वार्षिक परीक्षा ऑगस्ट २०२२ चा निकाल ९३.४४% लागला असून व्यवसायनिहाय प्रथम तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे :-

**शैक्षणिक सत्र ऑगस्ट २०२२ मधील प्रवेशित विद्यार्थाची सांख्यिकी माहिती**

| अ.क्र | व्यवसाय | प्रवेशित प्रशिक्षणार्थी - ऑगस्ट २०२२ |
|---|---|---|
| ०१ | कातारी / टर्नर | ०७ |
| ०२ | जोडारी / फिटर | ०९ |
| ०३ | तारतंत्री / वायरमन | २० |
| ०४ | मेकॅनिक (मोटार व्हेईकल) | २३ |
| ०५ | वेल्डर | १५ |
| ०६ | सुईंग टेक्नॉलॉजी | ०९ |
| | एकूण | ८३ |

# श्रीमती इंदिरा बेहरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था साडवली

## प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची सांख्यिकी माहिती.

| Sr. No | Trade | No of Units | Period | Intake Capacity | Statistical Information Up to July 2022 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ITI | | BTE | Trysem | Total | Trainee On Roll Aug. 2022 | | |
| | | | | | Boys | Girls | | | | Boys | Girls | Total |
| 01 | Turner | 2 | 2 Yrs. | 40 | 294 | 02 | 61 | 39 | 396 | 21 | -- | 21 |
| 02 | Fitter | 2 | 2 Yer. | 40 | 460 | 08 | -- | 08 | 476 | 25 | -- | 25 |
| 03 | Wireman | 2 | 2 Yer. | 40 | 287 | 02 | 57 | 148 | 494 | 34 | 02 | 36 |
| 04 | Welder | 1 | 1 Yr. | 20 | 227 | 02 | 42 | 19 | 290 | 15 | -- | 15 |
| 05 | Mechanic (Motor Vehicle) | 2 | 2 Yer. | 48 | 267 | 01 | -- | -- | 268 | 46 | -- | 46 |
| 06 | Sewing Technology | 1 | 1 Yr. | 20 | 04 | 65 | -- | -- | 69 | -- | 09 | -- |
| Total | | 10 | | 208 | 1539 | 80 | 160 | 214 | 1993 | 141 | 11 | 152 |

## कौशल्य दिक्षांत समारंभ





# श्रीमती इंदिरा बेहरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था साडवली

## "दीपकाडी महोत्सव 2022"

कोकणातील सड्यांचा समृद्ध ठेवा व वैभावशाली इतिहास जपण्यासाठी मातृमंदिर च्या वतीने कोकणातील पहिला "दीपकाडी महोत्सव" आयोजित केला .
सड्यांची जैवविविधता, मानवाच्या जीवनातील सड्यांचे महत्व आणी पर्यावरणीय परिसंस्थेमधील एक महत्वाचा भुभाग म्हणून सड्यांचे महत्व पुढील पिढीपर्यंत पोहोचावे व या प्रबोधनाच्या माध्यमातून सडेसंवर्धन व्हावे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होता.
महाराष्ट्रभरातील सडे अभ्यासक, या विषयात डॉक्टरेट करणारे विद्यार्थी, पर्यावरण शास्त्राचे विद्यार्थी व देवरुख प्रशासनातील मान्यवर तसेच स्थानिक शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती या पहिल्या महोत्सवाचे महत्व अधोरेखीत करते.
कार्यक्रमाची प्रस्तावना करताना मातृमंदिरचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांनी दीपकाडीच्या शोधाचा इतिहास मांडतानाच मातृमंदिरच्या १७ एकर जागेमध्ये असलेल्या सड्यांच्या संवर्धनासाठी पुढील काळात प्रयत्न करणार आहोत असे सांगीतले.
दीपकॅडी कोंकनेन्स असे शास्त्रीय नाव असलेल्या एकदांडी या कोकणातील कातळसड्यावर फुलणाऱ्या वनस्पतीचे मोजकेच अधिवास आता शिल्लक राहिले आहेत. या अधिवासांचे रक्षण होणसाठी प्रबोधन व्हावे म्हणून आज होत असलेला दीपकाडी महोत्सव अतिशय महत्वाचा आहे असे उद्गार गुजरात वरून या कार्यक्रमासाठी खास आलेले प्रसिध्द सडे अभ्यासक डॉ.अमित मिरगल यांनी काढले. देवरूख परिसरातील सड्यांवरील जैवविविधतेचे महत्व व संवर्धनाची पुढील दिशा याबाबत देवरुख मधील सडे अभ्यासक प्रतिक मोरे यांनी मांडणी केली.
सड्यांवर आढळणाऱ्या दुर्मिळ व महत्वपूर्ण वनस्पतींचे प्रदर्शन, याच विषयातील माहितीपट व सडे तज्ञांसह सडासफर अशा महत्वाच्या उपक्रमांच्या माध्यमातून दिवसभरात आलेल्या साधारण 800 पेक्षा विद्यार्थी, अभ्यासक व देवरुख मधील नागरिकांनी या महोत्सवात सहभाग घेतला.
या महोत्सवामध्ये नवनिर्माण कॉलेज, संगमेश्वर चे विज्ञान शाखेचे विद्यार्थी व मुंबई विद्यापीठ उपकेंद्र रत्नागिरीचे Msc चे विद्यार्थी तसेच मातृमंदिर ITI च्या विद्यार्थ्यांनी कार्यकर्ता म्हणून महोत्सवासाठी येणाऱ्याना माहिती देण्याचे काम केले.
कोकणातील कातळसड्यांचे महत्व पुढील पिढीपर्यंत योग्य पद्धतीने गेले तर सड्याचे आपल्या जगण्यातील महत्व समजून, आपल्या सभोवतालची परिसंस्था वाचवण्यासाठी पुढील काळात ही पिढी उभी राहील. म्हणून दीपकाडी महोत्सवाच्या माध्यमातून सडेसंवर्धन करण्याचा हा प्रयत्न मातृमंदिर देवरुख संस्था करत आहे.






# श्रीमती इंदिरा बेहरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था साडवली

## क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम २०२२










## माजी विदयार्थ्यी “स्नेहबंध मेळावा”



## राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२३



# शिबिरे व उपक्रम

वर्षभरातील ऋतु आणि ऋतूंप्रमाणे होणारे बदल निरीक्षणाने समजून घेण्याची एक दृष्टी मुलांमध्ये निर्माण व्हावी व हे बदल आपल्या आयुष्याशी कसे निगडीत आहेत याचा विचार करायला मुलांना उद्युक्त करावे यासाठी 'ऋतुसंवाद' शिबीर मालिकेतील २ शिबिरे अहवाल काळात दि.१७ ते २० एप्रिल २०२३ व २८ ते ३० ऑक्टोबर २२ या तारखांना मातृमंदिर शेतीफार्मवर घेण्यात आले.

या शिबिरांचे उद्घाटन अनोख्या पद्धतीने केले जाते. ३ दिवसीय निवासी शिबिरामध्ये खालील महत्वाचे विषय व उपक्रम घेण्यात आले.

**विषय**

ऋतुबदलाची गंमत
मातृमंदिरची गोष्ट
चित्रकार व ऋतुबदल
पथनाट्य
नेचर ट्रेल
आकाशदर्शन
ऋतुबदल व आहार
निसर्ग व अंधश्रद्धा
फार्म व्हीसित



**इतर धम्माल उपक्रम**

पथनाट्य, पत्रावळी तयार करून जेवणे, ट्रेजर हंट,योगासन/अरोबिक, गाणी-खेळ,कॅम्प फायर, माइंड मॅप, land art.



"ऋतुसंवाद शिबीर "
हिवाळी व उन्हाळी शिबीर



# शिबिरे व उपक्रम

## “युवा संवाद शिबीर २०२२ "

राज्यस्तरीय 'युवा संवाद' शिबिराचे मा.आमदार शेखर निकम यांच्या हस्ते उदघाटन...
मातृमंदिरचा 52 वर्षांचा युवा श्रमसंस्कार शिबीरांचा वारसा पुनरजीवित...

52 वर्षांची युवा श्रमसंस्कार शिबिराचा वारसा असलेल्या मातृमंदिर देवरुख येथील फार्मवर आजपासून राज्यस्तरीय शिबिराला सुरुवात झाली. संवादाच्या माध्यमातून युवा मनाची मशागत करू पाहणारे 5 दिवसीय राज्यस्तरीय युवा संवाद शिबीराचे उदघाटन लोकप्रिय आमदार शेखर निकम यांच्या हस्ते झाले.
शिबिराला सदिच्छा देताना आमदार साहेबांनी " युवकांच्या आयुष्याला दिशा देणारी अशी शिबीरे योग्य वयात मिळाली तर चांगल्या समाजाची निर्मिती होईल" असे सांगत मातृमंदिर चे संचालक व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.
5 दिवसाच्या या शिबिरात राज्यभरातून शिबिरार्थी आलेले आहेत. पुढील पाच दिवसात महाराष्ट्रभरातील दिग्गज मान्यवर इथे मार्गदर्शन करतील. युवकांच्या जगण्याला आकार देणारी गाणी, खेळ व विविध कृतियुक्त उपक्रम यामाध्यमातून युवकांच्या जगण्याच्या हेतूचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.
याप्रसंगी देवरुख नगरपंचायतचे मुख्याधिकारी चेतन विसपुते, नायब तहसीलदार गोताड साहेब, सहाय्यक BDO शिंदे साहेब, सामाजिक कार्यकर्ते युयूत्सु आर्ते, संस्थेचे उपाध्यक्ष विलास कोळपे, सेक्रेटरी विनय पानवलकर व देवरुख परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रभरातून आलेले कार्यकर्ते किरण, मयूर,सुमित,प्रज्ञा,दीपाली, अश्विनी, राजेश हे कार्यकर्ते शिबिरार्थीसह संवाद करतील.






# शिबिरे व उपक्रम

## “अनुभूती शिबीर २०२२ "

### निसर्गभानाची डोळस 'अनुभूती‘

अंधांचे वरवर काळोखे वाटणारे जग वास्तवात इंद्रधनूच्या विविधरंगी छटांनी फुललेले असतं याचा प्रत्यक्ष अनुभव 4 दिवसीय 'अनुभूती शिबिरात' आला.

मातृमंदिर देवरुख संस्थेच्या प्रा. मधू दंडवते कृषी विद्यालय येथील कॅम्प साईटवर NAB (National Association for the Blind ) या संस्थेच्या 30 शिबिरार्थीच्या निवासी शिबिर ८ ते ११ मी २३ दरम्यान घेण्यात आले. विविध उपक्रमांच्या माध्यमातून निसर्गासोबतच समाजभान देणाऱ्या या शिबिरामध्ये शिबिरार्थी अंध असले तरी कोणत्याही प्रकाराचा बदल ना करता अगदी डोळस शिबिरार्थिंसाठी घेतल्या जाणाऱ्या सर्व ऍक्टिव्हिटी यामध्ये घेण्यात आल्या.









# शिबिरे व उपक्रम


## “डेंटल कॅम्प – १४ मे २०२२ "

मातृमंदिर हॉस्पिटल येथे दोन दिवसीय मोफत दंतचिकित्सा शिबिराचे दि.१४ मे २०२२ रोजी सकाळी साम्यकुल सभागृहात उदघाटन झाले. या प्रसंगी व्यासपीठावर अपना बँकेचे मानद अध्यक्ष दत्ताराम चाळके, मातृमंदिर च्या अध्यक्ष मेघना चाळके, कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये, तज्ञ् डॉक्टर म्हणून डॉ. किसन गारगोटे, मातृमंदिरचे सेक्रेटरी विनय पानवलकर, संचालक संदेश शेट्ये इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## “कॅन्सरपूर्व तपासणी शिबीर – २२ एप्रिल २०२३ "

कॅन्सर पेशंट एड सोसायटी यांच्यातर्फे मातृमंदिर देवरुख येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर पार पडलं.
कॅन्सर पूर्व तपासणीसह रक्त तपासणी, नाक, कान, घसा तपासणी, महिला व पुरुषांची आरोग्य तपासणी अशा सर्व प्रकारची रुग्णतपासणी या शिबिरात करण्यात आली.
कॅन्सर पेशंट एड असोसियशनच्या एक्सिक्युटीव्ह डायरेक्टर नीता मोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रसिद्ध सर्जन डॉ. रवींद्र अंबार्डेकर, गायनोकॉलिस्ट डॉ. तृप्ती पोयरेकर, फिजीशियन वीणा बोरकर या तज्ञ् डॉक्टर टीमने रुग्णतपासणी केली. सोबत असलेल्या लॅब टेकनिशियन व इतर सर्व सहकार्यांनी शिबिरादरम्यान केलेल्या कामातून त्यांची सेवाभावी वृत्ती दिसून आली.





# शिबिरे व उपक्रम

## “गोकुळच्या मदतीसाठी ‘आमने सामने’ नाटकाचा प्रयोग "

मातृमंदिर गोकुळ बालगृहाच्या मदतीसाठी आयोजित आमने सामने नाटकाला मातृमंदिरप्रेमिंचा उत्साही प्रतिसाद.....

मातृमंदिर देवरुख संस्थेचा महत्वाचा उपक्रम असलेल्या गोकुळ बालगृहाच्या मदतीसाठी प्रसिद्ध अभिनेता मंगेश कदम व लीना भागवत यांची प्रमुख भूमिका असलेला 'आमने सामने' नाटकाचा प्रयोग दि.१३ नोव्हेंबर २२ रोजी  रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी येथे आयोजित केला होता. मातृमंदिर प्रेमीची उत्साही उपस्थिती आणि नाटकातील सर्वच कलाकारांचा उत्तम अभिनय यामुळे नाटक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले.
नाटकाच्या सुरुवातीला संस्थेचे सेक्रेटरी सुहास बने यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश शिर्के यांनी मातृमंदिर च्या सर्व उपक्रमांची सद्यस्थितीबाबत माहिती दिली. उपाध्यक्ष विलास कोळपे यांनी या कार्यक्रमा मागचा विचार सांगत मावाशिंच्या मूल्यांविषयी काही उदाहरणे सांगितली. शेवटी संस्थेच्या अध्यक्षा मेघना चाळके यांनी या नाटक प्रयोगामागची संस्थेची अपेक्षा, देणगीचे आवाहन करत उपस्थितांचे व यासाठी मेहनत घेणाऱ्या संस्था पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.
मातृमंदिर संचालक मंडळापैकी सुहास बने व विलास कोळपे यांच्या अथक मेहनतीमुळे गोकुळच्या मदतीसाठी केलेले नाटक यशस्वी झाले. सोबतच या नाटक प्रयोगामुळे मुंबईतील मातृमंदिर सदस्य, देणगीदार व हितचिंतकदेखील एकत्र आले.




# सेवादीप दिवाळी अंक २०२२

मागील 65 वर्ष सेवेचा वारसा जपत मातृमंदिर देवरुख नवनवीन उपक्रमांच्या माध्यमातून कार्यरत आहे. मातृमंदिर संस्थेचे संचालक, कर्मचारी, मित्रपरिवार, देणगीदार या सगळ्यांच्या प्रयत्नातून देवरुख परिसरातील सर्वसामान्यांसाठी आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास, पर्यावरण, युवा संस्कार अशा अनेक क्षेत्रात काम करत आहे.

मातृमंदिर च्या उपक्रमामागे असलेल्या गोष्टी, राबणारे हात, त्यांच्या भाव भावना या सर्वांचे एक महत्वाचे व्यासपीठ म्हणून 'सेवादीप' या दिवाळी अंकाचे प्रकाशन २५ ऑक्टोबर २२ मातृमंदिर च्या 'दिवाळी पहाट' कार्यक्रमात करण्यात आलं.

वाचन व तंत्रज्ञान याचा अतिशय क्रिएटिव्ह मिलाफ आपल्याला युवा पिढीत दिसतो. या युवा पिढीचा प्रतिनिधी असलेल्या असीम या तरुण मित्राच्या हस्ते हे प्रकाशन करण्यात आले. भारतात शिक्षण घेऊन आर्टिफिशल इंटेलीजन्स सारख्या जग बदलणाऱ्या विषयात तज्ञ म्हणून अमेरिकेत असीम कार्यरत आहे.मातृमंदिर कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये, कार्योपाध्यक्ष सुनील कोलवणकर, सामाजिक कार्यकर्ते युयूत्सु आर्ते, भाकर संस्थेचे देवेंद्रजी, सीमा हेगशेट्ये, सामाजिक कार्यकर्ते शेखर नलावडे, प्रशांत काबदुले, गुरव सर, हिदायत शेख, भस्मे साहेब अशी मातृमंदिर मित्रपरिवार व मातृमंदिर कर्मचारी, विद्यार्थी अशा सर्वांनी मिळून दिवाळीच्या सदिच्छा देत एकत्र फराळ केला.



# देणगी – मुख्य कार्यालय

| | | |
|---|---|---|
| SULBHA EKNATH KOLAGE | Thane | 4,500 |
| PRASHANT HEGISTYE | Ratnagri | 1,000 |
| DILIP MALVANKAR | Sawantwadi | 10,000 |
| LALITA VISHWAS BHAVE | Kolhapur | 10,000 |
| DHANANJAY RAGHUNATH DESHPANDE | Kolhapur | 50,000 |
| IMA PG INDIA PVT LTD | Mulund-Mumbai | 200,000 |
| | | 10,000 |
| RAGHUNATH TORANE | Thane | 10,000 |
| SUSHAMA SANJAY KHETLE | Thane | 100,000 |
| JYOTI PRAKASH MUNDALE | Thane | 2,500 |
| S.S.PIMPUTKAR | Mulund-Mumbai | 25,000 |
| VIDULA SANJAY DONGARE | Thane | 12,500 |
| KAMALAKAR MAHAJANI | Chembur-Mumbai | 10,000 |
| GITANJALI VASANT JAGUSTYE | | 8,000 |
| VIDYA NITIN KHISTI | Thane | 12,501 |
| GURUNATH D KOLHATKAR | Vile Parle- Mumbai | 10,000 |
| PRADIP SADASHIV CHALKE | Andheri-Mumbai | 5,000 |
| PRAKASH BALKRUSHNA MACHIVALE | Mulund-Mumbai | 26,000 |
| SUKHADA SURESH VAISHANPAYAN | Thane | 5,000 |
| SUCHITA SURYAKANT SAWANT | Ratnagiri | 2,000 |
| VINAY VISHAVANATH PARAB | Lalbaug -Mumbai | 1,000 |
| CHANDRAKANT ATMARAM RANE | Kankavali | 10,000 |
| SHRIKANT KDHONDO SATPUTE | Dombivali | 1,111 |
| PALLAVI PRAKASH PATIL | | 2,000 |
| PRAMOD VINAYAK KAMAT | Thane | 25,000 |
| AVADHUT TUKARAM POKALE | Mhapasa-Goa | 5,000 |
| PADMANABH SHRIPAD KARANDIKAR | Pimpari-Pune | 10,000 |
| THE CHAIRMAN/SECRETARY | Chembur-Mumbai | 1,001 |
| SHANTARAM BHAU DIVEKAR | Wadala-Mumbai | 5,000 |
| ASHISH PANDHARINATH MAHALE | Vile Parle- Mumbai | 11,000 |
| KUMAR DATTATRAY NANAVARE | Kolhapur | 12,000 |
| AJAY ANANT | | 1,000 |
| | | 15,000 |
| DILIP SITARAM KANERAO | Mulund-Mumbai | 100,000 |
| | | 10,000 |
| SANJAY BAPAT | Vile Parle- Mumbai | 15,000 |
| VANAZ ENGINEEARS LTD | Sadavali-Devrukh | 50,001 |
| KUMAR KRISHNAJI ABHYANKAR | Sangali | 30,000 |
| VASNTI VINAYAK MASUREKAR | Mahim-Mumbai | 5,000 |
| YASH MUMUND KHATU | Chembur-Mumbai | 25,000 |
| SMITA SHIDORE | Mulund-Mumbai | 1,101 |

| | | |
|---|---|---|
| KARYAKARI VISHVASTA KAI VINAYAK GOLPAL URF GOPAL VAMAN POTNIS TRUST | Fort-Mumbai | 10,000 |
| SHOBHANA PRABHAKAR NERURKAR | Wadala-Mumbai | 10,000 |
| PRABHAKAR SHANKAR NERURKAR | Wadala-Mumbai | 10,000 |
| | | 20,000 |
| PRAFULLATA DATTATRAYA SAMANT | Andheri-Mumbai | 11,000 |
| MANGALA SHAMKANT ALAVANI | Devrukh | 50,000 |
| UDAY BHANU | | 1,000 |
| KETAN CHANDRAKANT PARAB | MUMBAI | 11,000 |
| BHUSHAN KHATU | Majiwada-Mumbai | 2,001 |
| SHANTALA SHARAD MURDESHWAR | | 10,000 |
| RAJARAM SATU BANNE | Kolhapur | 2,000 |
| VASUDHA VASANT MOKAL | | 6,500 |
| VARSHA KIRAN PAWAR | | 7,800 |
| APARNA SHARAD KANETKAR | | 10,000 |
| | | 1,010,516 |

# देणगी – गोकुळ विभाग

| Name of donor | Address of donor | Amount |
|---|---|---|
| Pujari Apurva Vaman | Kothrud Pune | 6000 |
| Nangare Uday Narayan | satara | 4800 |
| More Kiran Shantaram | Mangaon-Raigad | 4400 |
| Shirke Amey | chinchvad pune | 4200 |
| Shraddha mahila Mandal Ratnagiri | Ratnagiri | 25000 |
| Kasar Shailaja Bhaskar | Shahupuri Kolhapur | 11000 |
| Powale Ankita | Utkad guhagar | 5000 |
| Jagtap Mayuri | Mahad | 7800 |
| Mane Anjali Prasad | Lonere Raigad | 8200 |
| Chalke Meghana | Mulund-mumbai | 10000 |
| Mane Anjali Prasad | Lonere Raigad | 6800 |
| Sarate Nikhil Vijay | Virar Mumbai | 3002 |
| Sarate Vijay | Virar Mumbai | 4000 |
| Chalke Meghana | Mulund- Mumbai | 100000 |
| Rajput Sasmit Satyavijay | Nate | 1000 |
| Santosh Ghag | Jogeshwari-Mumbai | 5000 |
| Kote Aruna Suhas | kalyan West | 5000 |
| Fadke Dilipkumar | Devgad | 10000 |
| landge Archana | Dombivali East | 1000 |
| Kulkarni Shweta Amol | Dombivali East | 500 |
| Rajput Sasmit Satyavijay | Nate | 500 |
| Rajput Sasmit Satyavijay | Nate | 500 |
| Rajput Sasmit Satyavijay | Nate | 1000 |
| Ambre Tushar vilas | Bhuvad colony devrukh | 1000 |
| Utane Nisha | kalyan west. | 5000 |

# देणगी – गोकुळ विभाग

| | | |
|---|---|---|
| Kshirsagar Suhas | Vileparle east mumbai. | 3000 |
| Samant Sushma Ratnakar | Borivali west | 50000 |
| Sumit Pratibha Sanjay | Latur | 7000 |
| Kharat Anita Pradip | Borivali. | 5000 |
| Karava Chandulal | Pune | 1000 |
| Alwani Chandrashekhar | Kalyan west | 2000 |
| Rajput Sasmit Satyavijay | Nate | 500 |
| Kamble Krushna Lahu | Pandharpur | 1000 |
| Date Moreshwar Vinayak | Vileparle mumbai | 200000 |
| Alwani Chandrashekhar | Kalyan west | 2000 |
| Ambre Vilas Parshuram | Bhuvad colony devrukh | 500 |
| Velankar Vaishali Madhav | Panvel. | 10000 |
| Mane Anjali Prasad | Lonere Raigad | 4800 |
| Mane Anjali Prasad | Lonere Raigad | 4800 |
| kadam Niraj rajesh | Kolad-Roha | 1000 |
| NK Yakub | Devrukh | 500 |
| Bhovad Chandrakant Shripati | Mumbai | 1500 |
| Kulkarni Supriya | Dombivali | 20000 |
| Bothale Ruksana | Devrukh | 5000 |
| Kedar Aasha | Mulund mumbai | 5000 |
| Thakur Hematai Dipaksheth | Virar (W) | 5001 |
| Parsharam Kashinath Govind | Bhuvad colony devrukh | 5000 |
| Lanja,rajapur-Sangameshwar taluka Utkarsh Mandal | Tardev-Mumbai | 1800 |
| Padalkar Chandra Chandrakant | Devrukh | 2000 |
| Gurav Sejal | Devrukh | 50 |
| Shinde Vaibhav | | 2500 |
| Joshi Dipak Gajanan | Chiplun | 5000 |
| Aarte Yuyutsu | Devrukh | 500 |
| Baikar Sunil | Indapur-Mangaon Raigad | 1000 |
| Shetye Sandesh | Sakharpa kondgaon | 2000 |
| Khetale Bhikaji Jayram | Asurde-Chiplun | 25000 |
| Khetale Sushama Sanjay | Thane | 3000 |
| Mudrale Mangala Hari | Chiplun | 2000 |
| Saibhakt Navjagrut Group | Kasar Kolvan | 2000 |
| Joshi Megha | Mumbai | 3500 |
| Shetye Abhijeet Chandrakant | Devrukh | 4000 |
| Vaidya Chetana Omkar | Goregaon-Raigad | 8400 |
| Sabanis Shantanu Ravindra | | 25000 |
| Barve Jayashree | Ratnagiri | 500 |
| Nikam Abhijeet | Devrukh | 1500 |
| IMPS | | 5000 |
| Kokate Dilip | Devrukh | 2501 |
| Pawaskar umakant Chintamani | | 1000 |
| Dhakras Madhav | Dombivali | 5000 |
| Pawar Dipali Dipak | | 1000 |
| Gurav Manohar shantaram | | 2500 |
| Sumitra | | 2500 |
| Pham my Nam | Netherlands | 3000 |
| UPI | | 5000 |
| Gavas Suresh Vishnu | | 10055 |
| | Total | 692609 |

# विविध उपक्रम



प्रजासत्ताक दिन



मातृमंदिर पालक संवाद




नाथ पै अभिवचन कार्यक्रम



फार्मवरील एकदिवसीय सहल



जेष्ठ समाजवादी कार्यकर्ते जी.जी.पारेख यांची मातृमंदिर भेट




जेष्ठ मार्गदर्शक गजानन खातू यांचे iti विद्यार्थ्यांशी संवाद



निरोप समारंभ – प्रसाद बालक मंदिर



बुधवार वाचनगट

# विविध उपक्रम



नेत्रचिकित्सा शिबीर




हळबे मावशी स्मृतिदिन



रविवार वाचनकट्टा – गोकुळ




फार्मवरील एकदिवसीय सहल




ITI – पदवीदान समारंभ



प्रजासत्ताक दिन- प्रसाद बालक मंदिर

# मातृमंदिर देवरुख – नाविन्यपूर्ण उपक्रम
























मातृमंदिर देवरुख संस्थेचा २०२२-२३ चा ऑडीट रिपोर्ट काहीच दिवसात याच ठिकाणी अपलोड केला जाईल.